MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक – दिपक थोरात



बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०२ | अंक –१४३ | शुक्रवार दि.०७ फेब्रुवारी २०२५ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रु | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -143 | FRIDAY DT.07 FEBRUARY 2025 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# गुंडांची बारी एस पी ऑफीसच्या दारी नवनीत कॉवतच लय भारीच

## बीड जिल्ह्यातील ८० गुन्हेगारांना एसपी ऑफिस मध्ये उभा करून दिल्या चांगल्या राहण्यासाठी सूचना

**प्रतिनिधी । बीड**

बीड जिल्ह्याच्या नवनीत कॉवत यांनी एसपी पदाचा पदभार घेतल्यानंतर गुन्हेगारांना आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासनातील नवीन उपाययोजना यशस्वी होऊ लागल्या बीडचे एसपी नवनीत कामत यांनी गुन्हेगारांना वाळू माफिया नंतर आता बीड जिल्ह्यातील ८० गुन्हेगारांना गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्यामुळे त्यांना बीड येथील पोलीस अधीक्षक कार्यालयामध्ये वाळू वाफेनंतर गुन्हेगारांना उभा करून त्यांना नोटीस बजावली असले ने अनेकांचे धाबे दणाणले आहेत त्यामुळे माफी या गुंडाराज आता संपुष्टात येऊन नवनीत कामत यांचे पोलीस प्रशासनातील कडक नियम हे बीडच्या जनतेला आता मोकळा श्वास घेण्यासाठी नागरिकांचा भयमुक्त होण्यासाठी एक चांगल्या प्रकारच टॉनिक आहे तर गुन्हेगारींना संपुष्टात आणून गुन्हेगार माफीयांचा कर्दनकाळ ठरणारे नवनीत काँवत हे एक चांगले पोलीस अधीक्षक म्हणून बिडकर यांच्या नजरेमध्ये एक खमक्या अधिकारी कसा असावा तर तो नवनीत काँवत यांच्यासारखा असावा अशी चर्चा व नवनीत काँवत त्यांच्या कामाचं कौतुक नागरिकांकडून होत आहे

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्हा बिहार झाला आहे बीडचा बिहार हॉल गुन्हेगारांचे माफिया बीड जिल्ह्यामध्ये अधिराज्य करत असताना खून दरोडा जातीय स्वरूपा बिघडणे तसेच वेगवेगळ्या माध्यमातून झालेले बीड जिल्ह्यातील गुंडगिरीला आळा घालण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवनीत कॉवत यांच्याकडे बीड जिल्हा पोलीस अधीक्षक पदाची जबाबदारी सोपवली. आणि बीडचे पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी एकापाठोपाठ एक बेधडक ॲक्शन घ्यायला सुरूवात केली आहे. आठवडाभरापुर्वीच ५० पेक्षा जास्त वाळू माफियांना बोलावून त्यांची परेड घेत पोलीसी खाक्यात समज दिल्यानंतर आता गंभीर स्वरूपाचे गुन्हे असलेल्या गुंडांची बारी आल्याचे दिसुन येत आहे. जिल्हाभरातील पोलीस ठाण्यांच्या रेकॉर्डवर असलेल्या गंभीर गुन्ह्यातील ८० जणांना पोलीस

अधिक्षक नवनीत काँवत साहेब यांनी आज दुपारी बोलावून घेतले होते. गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असणाऱ्या यापैकी काहींवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येऊ शकते. याशिवाय ज्यांच्यावर गंभीर स्वरूपाचे गुन्हे आहेत त्यांना समज देऊन यापुढे अशा प्रकारचे गुन्हे न करण्याबाबत तंबी दिली जाण्याची शक्यता आहे. दुपारनंतर ही परेड झाली आहे. जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस ठाण्यांतर्गत गंभीर स्वरूपाचे गुन्हे असलेल्या रेकॉर्डवरील व्यक्तींना

संबंधीत ठाणेप्रमुखांनी बोलावणे पाठवले आहे. त्या अनुषंगाने दुपारी अनेक जण पोलीस अधिक्षक कार्यालयात दाखल झाले या दरम्यान आजच्या या परेडच्या माध्यमातून पोलीस अधिक्षक संबंधीत व्यक्तींना समज दिली आहे. ज्यांच्यावर गंभीर स्वरूपाचे गुन्हे वारंवार दाखल झालेले आहेत. त्यांच्यावर काही कारवाई होते का ? हे पाहणे देखील महत्वाचे ठरणार आहे. आणि गुन्हेगारांनी आता नवनीत कॉवत यांच्या आदेशाचे पालन नाही केले तर त्यांना थेट आता मोका अंतर्गत कारवाई होण्याचीही शक्यता आहे गुन्हेगारी क्षेत्र सोडून आता अनेक गुन्हेगार सुधारणा करतील अशी अपेक्षा पोलीस प्रशासनावर बीड जिल्ह्यातील नागरिकांना आहे पण बीड जिल्ह्यामध्ये अनेक गुढेगार माफी असताना मात्र नवनीत कॉवत यांच्या दबंग एंट्रीने आता सर्वच गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहेत. म्हणून तर वाळू माफिया नंतर आता गुंडांची बारी एसपी ऑफिसच्या दारी नवनीत काँवत लय भारी

# शिंदेसेनेच्या कोट्यातील एसटी’चे अध्यक्षपद दिले परिवहन सचिवांकडे

## लोकप्रतिनिधींना टाळल्याने वाद शक्य

मुंबई /प्रतिनिधी

महायुती सरकारमध्ये २०१४ पासून एसटी महामंडळाचा अध्यक्षपदाचा कारभार परिवहनमंत्र्यांकडे दिला जातो. त्याप्रमाणे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांचा महामंडळाच्या अध्यक्षपदाचा प्रस्ताव मुख्यमंत्र्यांकडे पाठवण्यात आला होता. एसटी फायद्यात आणण्यासाठीच्या उपाययोजना सरनाईक यांनी सुरू केल्या होत्या. मात्र, बुधवारी रात्रीतून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक अध्यादेश काढून एकनाथ शिंदे गटाच्या शिवसेनेला झटका देत एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदावर अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठीची नियुक्ती केल्याने महायुतीमधील फडणवीस –शिंदे यांच्यात पुन्हा एकदा वादाची ठिणगी पडली आहे.

२०१४ मध्ये तत्कालीन परिवहनमंत्री दिवाकर रावते, अनिल परब यांच्याकडे एसटी महामंडळाचे अध्यक्षपद होते. त्यानंतर २०२४ मध्ये भरत गोगावले यांना अध्यक्षपदाची जबाबदारी दिली होती. मात्र, गोगावले कॅबिनेट मंत्री झाल्यानंतर त्यांना एसटी महामंडळाचा राजीनामा द्यावा लागला. सिडकोचे अध्यक्षपद संजय शिरसाट यांना देण्यात आले होते. मात्र, त्यांनाही नंतर सिडकोचा राजीनामा द्यावा लागला. एसटी महामंडळ प्रचलित पद्धतीनुनार महायुतीमधील एकनाथ शिंदेंच्या पक्षाचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांना मिळेल असा अंदाज होता. मात्र, फडणवीस यांनी नवी खेळी करत थेट अध्यक्षपदावर अतिरिक्त मुख्य सचिवांचीच नेमणूक केल्याने महायुतीमधील संघर्ष अधिक गडद होत आहे.



# अल्पसंख्याक समाजाचे कल्याणकारी योजना राबविणार मंत्री –भरणे



मुंबई प्रतिनिधी केंद्र व राज्य शासनाच्या अल्पसंख्याक समाजाच्या साठी कल्याणकारी योजना राबविणार असल्याचे अल्पसंख्याक विकास मंत्री दत्तात्रय भरणे यांनी आमदार इंद्रीस नायकवडी व शिष्य मंडळा दिली यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील ऊर्दू व फारसी विभाग सिनेट.सदस्य हसीन अख्तर शफी नवाज शेख गफुर शेख आदी उपस्थितीत होते यावेळी अल्पसंख्याक मंत्री भरणे यांनी सांगितले की राज्यात व केंद्रातील अल्पसंख्याक समाजाच्या साठी कल्याणकारी योजना राबविणार आहेत अल्पसंख्याक समाजातील लोकांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी आणि अल्पसंख्याक समाजाच्या व अडचणी सोडविण्यासाठी शासनाच्या सकारात्मक भूमिका आहे अल्पसंख्याक समाजाला विकासापासून वंचित राहु देणार नाही असे आश्वासन दिले आहे शासनाच्या अनेक योजना आहेत ते राबविणार तसेच अल्पसंख्याक समाजाचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावु असे आश्वासन दिले

# शिक्षण सचिवांच्या नावे बनावट अध्यादेश काढून 50 कला शिक्षकांना वेतनवाढ

## शिक्षण विभागात ओळख असल्याचे सांगत चांदणेने घेतले 17 लाख

शिक्षण विभागाच्या सचिवांच्या नावाने बनावट अध्यादेश काढून पुणे जिल्हा शिक्षण मंडळातील विविध माध्यमिक शाळांमधील ५० अपदवीधर कला शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणीचा लाभ मिळवून देण्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणी पुस्तक प्रकाशक डॉ. दीपक चांदणे यांच्याविरुद्ध बंडगार्डन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे (एसीबी) पोलिस निरीक्षक अमोल भोसले यांनी फिर्याद दिली आहे.शिक्षण विभागाचे सचिव प्रवीण मुंढे यांच्या नावाचा बनावट अध्यादेश काढण्यात आलेला असल्याचे उघडकीस आल्यावर या प्रकरणाची गंभीर दखल घेण्यात आली. या प्रकरणामध्ये डॉ. चांदणे याच्याबरोबरच अनेक जण सहभागी असण्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. त्या दृष्टीने तपास करण्यात येत आहे. पुणे जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ. भाऊसाहेब कारेकर यांना पैसे द्यायचे आहेत, असे सांगून डॉ. चांदणे यांनी शिक्षकांकडून १७ लाख रुपये गोळा केल्याचे प्राथमिक चौकशीत उघडकीस आले आहे. हा प्रकार पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या कार्यालयात १९ ऑक्टोबर २०२४ ते २७डिसेंबर २०२४ दरम्यान घडला. त्याबाबत तक्रार मिळाल्यानंतर 'एसीबी'ने तपास केला. त्यानंतर या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला.अतिरिक्त सचिव प्रवीण मुंढेंच्या डिजिटल स्वाक्षरीचा वापर करून जीआर एसीबीतील अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या विविध माध्यमिक शाळांमधील 'एटीडी' पदविका मिळवलेल्या अपदवीधर कला शिक्षकांनी 'एएम' ही पदवी मिळवल्यानंतर वरिष्ठ पदवीधर वेतनश्रेणी लागू करण्याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाकडे दाखल करण्यात आला होता. डॉ. दीपक चांदणे यांनी आपली शिक्षण विभागामध्ये ओळख असल्याचे भासवले. त्यांनी शासनाकडून आर्थिक लाभ मिळवून देण्याच्या हेतूने अन्य आरोपींच्या मदतीने शालेय शिक्षण आणि क्रीडा विभाग यांचे अतिरिक्त सचिव प्रवीण मुंढे यांच्या डिजिटल स्वाक्षरीचा वापर करून बनावट शासन निर्णय तयार केला.या

### बनावट जीआरही तयार केला

बनावट शासन निर्णय समाज माध्यमात प्रसारित झाला. शिक्षणाधिकारी डॉ. भाऊसाहेब कारेकर यांच्या निदर्शनास ही बाब आली. त्याची छाननी करण्यात आल्यानंतर संबंधित शासन निर्णय राज्य शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर कोठेही आढळून आलेला नाही. अतिरिक्त सचिव प्रवीण मुंढे यांच्या बनावट स्वाक्षरीने हा खोटा आदेश काढण्यात आल्याची बाबही समोर आली. त्यानंतर डॉ. भाऊसाहेब कारेकर यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे गेल्या महिन्यात तक्रार केली होती. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने या शिक्षकांशी, मुख्याध्यापकांकडे चौकशी केली असता प्रकार उघडकीस आला.

बनावट शासन निर्णयाचा संदर्भ टाकून शिक्षणाधिकारी यांच्या बनावट सह्यांचा बनावट आदेश तयार केला. त्यासाठी डॉ.दीपक चांदणे याने शिक्षकांकडून एकूण १७लाख रुपये गोळा केल्याचे उघडकीस आले.

## अशोक मोहिते मारहाण प्रकरण

# दोघांना अटक



बीड: मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाचे आणि वाल्मिक कराड संदर्भातील बातम्यांचे व्हिडीओ पाहत असल्याच्या रागातून दोघांनी अशोक मोहिते याला मारहाण केल्याची घटना घडली होती. या घटनेत अशोक मोहितेच्या डोक्याला आठ टाके पडले होते. अशोक मोहिते गंभीर जखमी झाला होता. तर, मारहाण करणारे वैजनाथ बांगर आणि अभिषेक सानप हे दोघेही फरार झाले होते. धारुर पोलिसांनी आरोपींच्या शोधासाठी पथकं तयार केली होती. अखेर आरोपींना कर्नाटकमधून अटक करण्यात पोलिसांना यश आलं आहे.

अशोक मोहिते मारहाण प्रकरणातील आरोपी वैजनाथ बांगर आणि अभिषेक सानप या दोघांना अटक करण्यात आली आहे. धारुर पोलिसांनी या दोघांना कर्नाटकमधून अटक केली आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरण आणि वाल्मिक कराडच्या बातम्या का बघतो म्हणत दोघांनी मोहितेला मारहाण केली होती. सध्या अशोक मोहिते वर लातूर येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत

**अशोक मोहितेवर लातूरमध्ये उपचार**

केज तालुक्यातील तरनळी या ठिकाणी होमगार्ड अशोक मोहिते यांना गावातीलच दोन तरुणांनी संतोष देशमुख हत्या प्रकरणातील बातमी आणि वाल्मिक कराडचे व्हिडिओ पाहत असल्यानं मारहाण केली होती. या टनेत अशोक मोहितेच्या डोक्याला आठ टाके पडले होते. खबरदारीचा उपाय म्हणून अशोक मोहितेवर लातूरमध्ये उपचार करण्यात येत आहेत.

**वैजनाथ बांगर अन् अभिषेक सानपकडून कृष्णा आंधळेला शुभेच्छा**

आरोपी वैजनाथ बांगर आणि अभिषेक सानप या दोघांनी संतोष देशमुख हत्या प्रकरणातील फरार आरोपीला 5 फेब्रुवारीला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या होत्या. मिस यू भाई म्हणत त्यांनी स्टेटसला कृष्णा आंधळे याचे फोटो ठेवले होते. पोलिसांनी या प्रकरणी दोघांवर कारवाई करणार असल्याचं देखील म्हटलं होतं.

मस्साजोगचे संरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी कृष्णा आंधळे तपास यंत्रणेला सापडत नाही. तर दुसरीकडे त्याचं समर्थन करत त्याला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या जात आहेत. त्यामुळे याची दखल पोलीस प्रशासन नेमकी घेते कशी? असा प्रश्न देखील निर्माण झाला होता.

दरम्यान, धारुर पोलिसांनी अशोक मोहिते प्रकरणातील आरोपींच्या शोधासाठी पथकांची स्थापना केली होती. अभिषेक सानप आणि



# शेतकऱ्याचा अंत पाहू नका, तत्काळ विद्युत पुरवठा सुरळीत करा:- राजेंद्र आमटे

## वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी महावितरण च्या विरोधात आक्रोश मोर्चा

**प्रतिनिधी** । बीड

खांडे पारगाव परिसरातील शेतकऱ्यांना विद्युत पुरवठा सुरळीत होत नसल्याने वैतागलेल्या शेतकरी, नागरिक महिला, विद्यार्थी यांच्या वतीने महा वितरण विरोधात शेतकरी आक्रोश मोर्चा, व जाहीर निदर्शने आंदोलन शिवसंग्राम शेतकरी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे यांच्या पुढाकाराने अधीक्षक अभियंता विभागीय महावितरण कार्यालय जालना रोड बीड येथे करण्यात आले.

महावितरण अधीक्षक अभियंता विभागीय कार्यालय जालना रोड बीड येथे प्रभारी अधीक्षक अभियंता कांबळे साहेब कार्यकारी अभियंता सानप साहेब यांना निवेदन देऊन शेतकऱ्यांनी महावितरण कार्यालय मध्ये जाहीर निदर्शने केली तीन तास शेतकरी, महिला, नागरिक यांनी ठिय्या आंदोलन केलं शेतकरी महावितरण विरोधात आक्रमक भूमिका घेतली. लेखी आश्वासन दिल्याशिवाय न उठण्याचा निर्णय शेतकरी घेतला शेतकऱ्यांच्या भूमिके पुढे प्रशासन झुकले तत्काळ लेखी आश्वासन देत आंदोलन मघे घेण्याचे विनंती केल्यावर शेतकऱ्यांनी आंदोलन तात्पुरते स्थगित केले.

आमदार संदीप क्षीरसागर यांनी शेतकरी आक्रोश मोर्चा भेट देऊन पाठींबा दिला व अधिकारी यांना सूचना केल्या व डॉ ज्योतीताई मेटे यांनी अधीक्षक अभियंता यांना दूरध्वनी संपर्क करून प्रश्न सोडवण्याच्या सूचना केली जिल्हाध्यक्ष सुभाष जाधव शिवसंग्राम जिल्हाध्यक्ष, राजेंद्र मस्के राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष, यांनी शेतकरी आंदोलनास भेट देऊन पाठींबा दिला

अधीक्षक अभियंता महावितरण यांनी सात गावातील विद्युत पुरवठा सुरळीत केला जाईल, सात गावात नवीन विद्युत तारा बदलण्याचे काम सुरू करू ,उच्च दाबाने विद्युत पुरवठा केला जाईल, ५ चत- ट्रान्सफॉर्मर निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यावर बसवण्याची अंमलबजावणी करू, नवीन विद्युत उपकेंद्र प्रस्ताव मागून घेण्यात येईल, शेख यांची नियुक्ती निर्णय घेण्यात येईल वरील मागण्याचे लेखी आश्वासन देत आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले

या मुळे खांडे पारगाव परिसरातील खांडे पारगाव, अंथरवान प्रिंपी, नागपूर खुर्द, उमरद खालसा, नागपूर बुद्रुक, उमरी, अंथरवान प्रिंपि तांडा वेळी शेतकऱ्याने आक्रमक भूमिका घेत तत्काळ मागण्या करण्यात यावी असे शिवसंग्राम शेतकरी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे, जालिंदर साळुंके,राहुल टेकाळे सचिव प्रदेश युवक कॉंग्रेस, सुहास पाटील,अनिल घुमरे, शिवसंग्राम सरचिटणीस, सरपंच भाई प्रभाळे, काचारू जाधव, दीपक खुराने,गणेश घोडे उमरद सरपंच, सुभाष गिराम, मनोज जाधव शिवसंग्राम , किशोर ढोकणे सरपंच, सुरेश पवार, इंद्रजित लव्हाले, वसंत शिंदे, प्रवीण शिंदे,तीर्थराज साळुंके, जांगु साळुंके,आदी सह शेकडो शेतकरी उपस्थित होते

# जगद्गुरु श्री नरेंद्राचार्य महाराज यांचा आंबेजोगाई येथील पादुका दर्शन सोहळ्यामध्ये

## ५५ गोरगरीब व गरजू महिलांना शिलाई मशीनचे वाटप

**प्रतिनिधी** । अंबाजोगाई

अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या दिव्य पादुकांचे दर्शन अंबेजोगाई येथे हजारो भाविक भक्तांनी घेतले .सकाळी ८ ते संध्याकाळी ९ वाजेपर्यंत पूर्ण दिवसभर कार्यक्रम सुरू होता.२८ जानेवारी रोजी मंगळवारी अंबेजोगाई येथे सकाळीच ९ वाजता आंबेजोगाई येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून मिरवणुकीला सुरुवात झाली. मिरवणुकी मध्ये समोर बॅन्जो गाडी, त्याच्या पाठी मागे मिरवणुकीचा बॅनर, कलशधारी महिला, निशाण धारी महिला, संबळ पथक, निशाण धारी पुरुष, वासुदेव पथक, ५ घोडे आणि ६ ऊंट यांच्यावर महापुरुषांचे वेगवेगळे देखावे, भजणी मंडळ, माऊलींचा रथ, ५ ट्रॅक्टर ट्रॉली मध्ये शाळेतील विद्यार्थ्यांचे वेगवेगळे देखावे आणि त्यांच्या पाठीमागे इतर भक्तगण अशी मिरवणूक डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे कार्यक्रम स्थळी

१२ वाजता पोहोचली. संत पिठावर आल्यावर स्वामींची आरती करण्यात आली, त्यानंतर बीड जिल्ह्यातील राजकीय मान्यवरांच्या हस्ते गोर गरीब व गरजू महिलांना ५५ शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले. त्यानंतर चिठ्ठ्या टाकून भक्तगणातून एका भाविकांची लहान मुलांच्या हाताने चिठ्ठी काढण्यात आली त्यांच्या हस्ते संतपिठावरील गुरु पूजन व मंडप मधील भक्तगणांचे गुरुपूजन झाले, त्यानंतर जनम. प्रवचनकार सौ. तनवी मोरे ताईंचे प्रवचन झाले. त्यानंतर सर्व भाविकांना महाप्रसादाची सोय



करण्यात आली होती .सर्वांनी महाप्रसादाचा आस्वाद घेतला, या कार्यक्रमांमध्ये ४०६ भक्तगणांनी भक्त दीक्षा घेतल्या. त्यानंतर सिद्धपादुकाच्या दर्शना साठी भाविकांच्या लांब पर्यंत रांगा लागल्या होत्या रात्री ९ पर्यंत दर्शन चालू होते .त्यानंतर सिद्ध पादुका पुढील कार्यक्रमासाठी रवाना झाल्या. या भव्य दिव्य कार्यक्रमासाठी आयोजक, जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज भक्त सेवा मंडळ अंबेजोगाई व बीड जिल्हा यांच्या वतीने अथक परिश्रम घेण्यात आले आणि कार्यक्रम संपन्न झाला.




महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई डिजिटल मीडियाच्या वडवणी तालुका अध्यक्ष पदी सतीश मुजमुले यांची निवड झाल्याबद्दल अभिनंदन व पुढील कार्यासाठी शुभेच्छा देताना करण सरवदे प्रशांत गवाने महेश बनसोडे विशाल जाधव श्रिराम माळी उम अवचर बबलु चव्हाण बाळु माळी

# रेल्वे प्रशासनाला उर्दू भाषेची एलर्जी का?

## खासदार साहेब ला भेट देऊन चर्चा करणार इमरान जागीरदार ??


**प्रतिनिधी** । बीड

बीड येथील रेल्वे प्रशासनाकडून उर्द नावाचा विसरन का नियमाप्रमाणे रेल्वे स्टेशनचे नाव तीन भाषेत असतात मराठी इंग्रजी उर्दू मात्र बीड रेल्वे स्टेशन चं नाव उर्दू भाषेत न केल्याने बीडचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांची भेट घेऊन या विषयावर चर्चा करणार इम्रान जागीरदार रेल्वे स्थानकांच्या नावांचे फलक



सामान्यतः हिंदी, इंग्रजी आणि स्थानिक भाषांमध्ये लिहिले जातात. उर्दू ही अनेक राज्यांमध्ये स्थानिक भाषा म्हणून मान्यताप्राप्त आहे, त्यामुळे तेथे रेल्वे स्थानकांच्या फलकांवर उर्दूचा समावेश असतो. बीडमध्ये उर्दू भाषेचा समावेश का करण्यात आलेला नाही, याबाबत नेमकी माहिती उपलब्ध नाही. तथापि, उत्तराखंडमधील डेहराडून स्थानकाच्या नावाच्या फलकावर उर्दूऐवजी संस्कृतचा समावेश केल्याने वाद निर्माण झाला होता, ज्यामुळे प्रशासनाने पुन्हा उर्दूचा समावेश केला . या प्रकरणावरून असे दिसते की स्थानिक भाषांच्या समावेशाबाबत धोरणे आणि निर्णय स्थानिक प्रशासनाच्या धोरणांवर अवलंबून असतात.

आपण आपल्या स्थानिक खासदारांना किंवा रेल्वे प्रशासनाला संपर्क साधून बीड रेल्वे स्थानकाच्या फलकांवर उर्दू भाषेचा समावेश करण्याची विनंती करू शकता. स्थानिक भाषांचा सन्मान आणि समावेश सुनिश्चित करण्यासाठी प्रशासनाला विनंती करणे उपयुक्त ठरू शकते. बीड रेल्वे स्टेशनचा उर्दू भाषेत फलक लावण्यात यावा अशी मागणी जय शिवसंग्राम युवा नेते इमरान जागीरदार यांनी पत्रक द्वारे केली आहे




# लहू क्रांती संघर्ष सेना,महाराष्ट्र युवक प्रदेशाध्यक्ष पदी अशोक साबळे यांची निवड करण्यात आली

**प्रतिनिधी** । परतुर

परतूर जिल्हा जालना येथे दि. २ / २/ २०२५ रोजी दुपारी दोन वाजता संघटनेचे अध्यक्ष राजू भाई कसबे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक पार पडली.या बैठकीत सामाजिक, शैक्षणीक, व आर्थिक स्थिती,समाजावर वाढलेला अन्याय अत्याचारासंदर्भात चर्चा करण्यात आली. यावेळी या बैठकीत संघटनेची नूतन कार्यकारिणी निवड करण्यात आली.यामध्ये संघटनेच्या महाराष्ट्र उपाध्यक्ष पदी,मोहन कांबळे,संघटक पदी , विठ्ठल नाटकर,युवक प्रदेशाध्यक्ष पदी, अशोक साबळे, मराठवाडा अध्यक्षपदी, कैलास काळे,जालना जिल्हा कार्याध्यक्ष पदी, विठ्ठल भारसाकळे,तर परतूर तालुका कार्याध्यक्ष पदी, सतिश थोरात यांची निवड करण्यात आली. सूत्रसंचालन बाळू सौदागर यांनी केले तर तर आभार अशोक साबळे यांनी मानले त्यावेळी या बैठकीला संघटनेचे अनेक पदाधिकारी आणि समाज बांधव उपस्थित होते.

# गेवराई सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीची कार्यकारिणी जाहीर

**प्रतिनिधी** । गेवराई

गेवराई : दि. ६ फेब्रु. गुरुवार गेवराई शहरात सार्वजनिक साजरा होणाऱ्या आदर्श शिवजयंतीच्या नियोजनाची बैठक रोजी सिंधी भवन येथे संपन्न झाली.गेवराई सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांची निवडड.संजय भाऊ काळे व शहरातील प्रतिष्ठित नागरिकांच्या उपस्थितीत पार पडली .अध्यक्षपदी सर्वप्रथम श्री. राहुल जिजा खंडागळे, सुभाषराव मुळे, ड राहुलकुमार राका (नोटरी), विकास पवार, सागर परदेशी, तर उपाध्यक्षपदी आनंद दाभाडे, डॉ. मिलिंद गावडे, गणेश निकम, महेश निळकंठ, संदीप साळवे, गणेश गाडेकर, सुघोष मुंडे, कमलेश वाघमारे, शेख मन्सूर भाई, शुभम कानडे. कार्याध्यक्षपदी शामराव गायकवाड पाटील तर सचिव पदी समाधान जिजा मस्के, सहसचिव श्रीनिवास बेदरे, कोषाध्यक्ष पदी मुकेश अण्णा महाजन, सह कोषाध्यक्ष दिग्विजय (गोटू शेठ) पोतदार मिरवणूक समिती बाळासाहेब मोटे, शिरीष भोसले बाबासाहेब घोडके, तुळशीराम मोहरकर, विलास खिसाडे, बबलू खराडे, साहिल देशमुख, माधव अण्णा बेदरे, बाबुराव गवारे, जयसिंग माने, बंटी यादव, शेख मंजूर भाई बारुदवाले, अक्षय पवार, विलासराव मस्के गोविंद दाभाडे अमोल गावडे, उमेश निकम, अशोक जवंजाळ, जयेश दाभाडे, शाम निकम, लंकेश मोटे, गणेश घुंबाडै, मगन दायमा, श्रीपाद रामदासी, दिनेश मोटे, शंकर परळकर, मनोज हजारे, हरिभाऊ वाघ, लखन चोरमले, उमेश पवार, निखिल जंगले, महादेव कानगुडे, अभिजीत छाजेड, रमेश पवार, अक्षय हातगुले, सुनिल पालवे, महेश नागरे, आनंद जाधव, बाबासाहेब गायकवाड, रणजीत डरपे, अंकुश धापसे, श्रीराम चोरमले, दीपक खंडागळे, बाली मापारे हरिभाऊ वाघ. कैलास वाघरे, शरद धापसे, संभाजी निकम कार्यकारी समिती आमदार विजयसिंह राजे पंडित मा. आ. बदामराव पंडित, लक्ष्मण अण्णा पवार, ड.. संजय भाऊ काळे, ऋषिकेश बेदरे, ड.अमित मुळे, प्रताप शेठ खरात, सतिष दादा दाभाडे, श्याम काका येवले, रोहीत पंडित,धम्मपाल कांडेकर, बाळासाहेब सानप, शफीभाई आतार, गणेशराव नलवडे,जयराज सेठ कौराणी, श्याम भाऊ भुतडा, उत्तमराव सोलाणे, मनोहर भाऊ पिसाळ, सुशील भाऊ जवंजाळ, कैलासराव माने, केशव पंडीत, राजेंद्र डाके पाटील, भाऊसाहेब गोंजारे, विलास निकम, सचिन पंडित, बाळासाहेब लाटे पाटील, प्रशांत जाकिटे,जान मोहम्मद बागवान, ॲड बाबासाहेब घोक्षे, राजेंद्र दादा बेदरे, प्रमोद मोटे, राजेंद्र मोटे, तुकाराम कदम, संजय भालशंकर, शैलेश जाजू, रवि शेठ लाड, बाळासाहेब गायकवाड, ऍड रवींद्र गवारे, ब्रह्मदेव देवा धुरंधरे, प्रभाकर, तात्या पिसाळ, नामदेव जवंजाळ, मनोहरराव चाळक. गणपतराव काकडे शिव आरोग्य समिती डॉ शाम बेलगुडे, डॉ अशोक काळे, डॉ दीपक फाटक सर, डॉ सराफ, डॉ गणेश काकडे, डॉ अनिल दाभाडे, डॉ अनिल वाधवाणी, डॉ गणेश फलके, डॉ मुरलीधर मोटे, डॉ पंकज बांगर, डॉ आनंद मोटे, डॉ गणेश राऊत, डॉ सचिन म्हेत्रे, डॉ निलेश हिंगे, डॉ चाळक सांस्कृतिक समिती प्रा. सुनिल मुंडे सर, शाहीर विलास सोनवणे, महादेव चाटे सर, शेख खॉजाभाई. प्रसिद्धी समिती अंकुश आतकरे, अमोल वैद्य, बापूसाहेब हुंबरे, काझी अमान साहेब, कैलास भाऊ हादगुले, सुशीलकुमार टकले, सुभाषराव शिंदे, सुनील पोकळे, अमोल कापसे, अनिल आगुंडे.





# स्व. बबनराव मस्के सरांच्या जन्मदिनानिमित्त त्यांचा स्मृतीप्रित्यर्थ

## श्री. महादेव राजेसाहेब चव्हाण (मु.अ) यांना आदर्श शिक्षक पुरस्कार- वर्ष ४थे

**प्रतिनिधी** । बीड

मरावे परी कीर्तीरूपे उरावे असे म्हणतात. या उक्तीप्रमाणे जिल्हा परिषदेचे एक आदर्श शिक्षक स्वर्गीय बबनराव मस्केसर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मादळमोही येथे त्यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी शाळेस मस्के कुटूंबीयातर्फे साऊंड सिस्टीम भेट देण्यात आली. तसेच स्व. बबनराव मस्के यांच्या स्मरणार्थ आदर्श शिक्षक म्हणून केंद्रीय मुख्याध्यापक श्री. महादेव राजेसाहेब चव्हाण यांचा स्मृती चिन्ह व श्रीफळ देऊन श्रीम. साक्षीताई राजेंद्र वारंगे सरपंच मादळमोही व मान्यवरांच्या शुभहस्ते गौरव करण्यात आला. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून गावचे सरपंच श्रीम. साक्षीताई राजेंद्र वारंग तर प्रमुख अतिथी उपसरपंच श्रीम. मेहराज अबुबकर शेख , शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. ज्ञानेश्वर जगन्नाथ तळेकर व श्री. सोमनाथ जालिंदर पुरी , मा.श्री. धनंजय शिंदे साहेब गट शिक्षण अधिकारी पं.स. गेवराई ,मा. प्रविनकुमार काळम पा. जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी पं.स. गेवराई, मा. महादेव साबळे शिक्षण विस्तार अधिकारी पं.स.बीड,माटे मॅडम व अनेक प्रतिष्ठित नागरीक उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन मस्के कुटुंबाच्या पवनराज मस्के , गणेश मस्के,दिपाली घरत व समस्त मस्के कुटुंबाच्यावतीने करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक वृंद व ट्रेनी शिक्षक श्री संजय वखरे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. विलास पवार सर यांनी केले.

# तुकडेबंदी सुधारणा कायदा दोन्ही सदनात मंजूर होऊनही गोरगरीबांच्या स्वप्नातील घरांचा मार्ग मोकळा होईना!

## उच्च पदस्थ प्रशासनिक अधिकाऱ्यांसह राजकीय नेत्यांनी लक्ष देण्याची गरज – एस.एम.युसूफ़

**प्रतिनिधी** । बीड

तुकडेबंदी सुधारणा कायदा महाराष्ट्र राज्याच्या विधान परिषद आणि विधानसभा अशा दोन्ही सदनात मंजूर होऊनही त्यावर अद्यापही अंमलबजावणी होत नसल्याने गोरगरीबांच्या स्वप्नातील घरांचा मार्ग काही मोकळा होईना. तरी याकडे उच्च पदस्थ प्रशासनिक अधिकाऱ्यांसह राजकीय नेत्यांनी लक्ष देण्याची गरज असल्याचे मत मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून व्यक्त केले आहे.याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, राज्याच्या विधान परिषद तसेच विधान सभा अशा दोन्ही सदनात तुकडेबंदी सुधारणा कायदा मंजूर करण्यात आला आहे. यामुळे आता १,२,३ गुंठ्यांची खरेदीखत प्रक्रिया सुरु व्हायला हवी होती परंतु ती अद्याप पर्यंत सुरूच झाली नाही. तुकडेबंदी अंमलबजावणीसाठी कायद्यात सुधारणा करून १, २, ३ गुंठे जागेच्या खरेदी विक्रीसाठी कायदेशीर मान्यता देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेऊनही अद्याप पर्यंत त्याच्यावर अंमलबजावणी सुरू करण्यात आलेली नाही. विशेष म्हणजे नुकत्याच नागपूर येथे घेण्यात आलेल्या हिवाळी अधिवेशनात या विधेयकाला सर्वसंमतीने मंजुरी देण्यात आलेली आहे. तत्पूर्वी तुकडेबंदी कायद्यात सुधारणा करण्यासाठी १५




ऑक्टोबर २०२४ रोजी अध्यादेश जारी करण्यात आला होता. यामुळे लहान भूखंड खरेदीचा मार्ग मोकळा झाला असूनही १,२,३ गुंठ्यांवर आधारित व्यवहार अजूनही प्रशासन दरबारी सुरूच करण्यात न आल्याने सर्वसामान्य गोरगरीब स्वतःच्या घरासाठी जमीन घेऊन घर बांधण्याचे स्वप्न अजूनही पूर्णत्वास जात नसल्याचे बीड जिल्ह्यात दिसून येत आहे. तरी याकडे उच्च पदस्थ प्रशासनिक अधिकाऱ्यांसह राजकीय नेत्यांनी लक्ष देण्याची गरज असल्याचे मत मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून व्यक्त केले आहे.

# मधुकर खाडे यांचे निधन

**प्रतिनिधी** । बीड

तालुक्यातील होळ येथील पैलवान मधुकर दत्तुबा खाडे यांचे गुरुवारी (दि.६) उपचारादरम्यान पुणे येथे रुग्णालयात निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ६४ वर्षे होते.होळ येथील शिवछत्रपती क्रीडा व व्यायामशाळा, संत भगवानबाबा वारकरी शिक्षण संस्थेचे ते सचिव होते. व्यायामशाळा परिसरातील विद्युत पोललगत असलेल्या झाडांच्या फांद्या ते स्वतः झाडावर चढून कापत होते. यावेळी विद्युत तारेला स्पर्श होऊन करंट लागल्याने ते खाली कोसळले. यावेळी त्यांच्या पाठ व पोटाला गंभीर ईजा झाली होती. उपचारादरम्यान पुणे येथे त्यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पोलीस



दलात कार्यरत गोविंद, व्यंकटी, व्यवसायिक बालाजी ही तीन मुले आहेत. तसेच, दोन भाऊ, वडील, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्यावर होळ येथे शिवछत्रपती क्रीडा व व्यायामशाळेसमोर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी वारकरी सांप्रदाय, कुस्ती, राजकीय, सामाजिक क्षेत्रातील नागरिकांची उपस्थिती होती.

# शेतकऱ्यांची संपुर्ण सोयाबीन खरेदी करण्यात यावी

## किसान सभेच्या वतीने तहसील कार्यालय माजलगाव येथे निवेदन देऊन निदर्शने करण्यात आले

**प्रतिनिधी ।** माजलगांव

सोयाबीन उत्पादकाचा उत्पन्नाचा खर्च पाहता महाराष्ट्र सरकारने सन २०२४-२५ साठी प्रतिक्विंटल ६९४५ रुपयाचा हमीभावाची शिफारस केली होती. परंतु केंद्र सरकारने घोषित केलेला ४८९२ प्रतिक्विंटल भाव यातही खुल्या बाजारामध्ये शेतकऱ्यांची गरज म्हणून ३५०० पासून ते ४१०० पर्यंत सोयाबीन व्यापारी खरेदी करत आहेत. यामुळे काही शेतकऱ्यांनी नाफेडच्या सोयाबीन खरेदी केंद्रावर नोंदणी केली व किमान सोयाबीन उत्पन्नाचा खर्च तरी निघेल या आशेवर असतांना बीड जिल्ह्यात नोंदणी केलेल्या ४४७४४ शेतकऱ्यांपैकी काल पर्यंत अर्ध्याही शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी होऊ शकले नाही. झालेल्या खरेदीत




शेतकऱ्याची बारदान, कडता, हमाली या नावावर लूट करून शेतकऱ्यांना हमीभावा पासून दूर ठेवले जात आहे. तर दुसऱ्या बाजूला आज हमीभाव खरेदी केंद्राची मुदत संपणार आहे. यामुळे नोंदणी केलेचे अर्ध्या पेक्षा जास्त शेतकरी हे खरेदी पासून वंचीत राहत आहे. तेव्हा नोंदणी केलेल्या शेतकऱ्याचे सोयाबीन खरेदी करणे बंधणकारक असल्यामुळे संपूर्ण सोयाबीन खरेदी करण्यात यावे. ज्या शेतकऱ्यांना अडचणीमुळे सोयाबीन खुल्या बाजारात विकावे लागले. त्या शेतकऱ्यांना हमीभाव फरकाची रक्कम देण्यात यावी.देशात व राज्यात सत्तेत बसलेल्या सरकाराने निवडणूकीत दिलेले ६००० रू प्रतिक्विंटल सोयाबीन भावाचे आश्वासन व राज्यसरकाने शिफारस केलेले ६९४५ रू. तर दूरच राहिले किमान ४८९२ या हमीभावाने तरी सर्व शेतकऱ्याचे सोयाबीन खरेदी करावे. अन्यथा शेतकरी आंदोलनात उतरेल. यावेळी किसान सभेचे नेते कॉ दत्ता डाके, मा क पा सचिव कॉ शिवाजी कुरे ,किसान सभा तालुका अध्यक्ष कॉ कृष्णा सोळंके , ता कमिटी सदस्य कॉ गणेश कदम शेतकरी बळीराम फपाळ, गणेश तिडके, किसन मुळे, विठ्ठल जगताप, भगवान बापमारे, कृष्णा घाटूळ, प्रवीण थेटे, माणिकराव मुंडे, प्रभाकर रासवे, इम्रान पठाण, व इतर सोयाबीन उत्पादक शेतकरी यावेळी उपस्थीत होते



# देवडी गावात रमाई जयंती साजरा करण्यात आली

त्यावेळी उपस्थित देवडी गावचे सरपंच अतुल झाटे ख.लिमगाव चे सरपंच गणेश आंबुरे मच्छिंद्र बप्पा झाटे एसएफआय चे तालुका सचिव अभिषेक आडागळे तालुका कमिटी सदस्य राहुल वैरागे मा.ग्रा.प.सदस गितेश आगे एसएफआय तालुका उपाध्यक्ष करण भिसे मदन आडागळे माऊली वैरागे चेअरमन जगन्नाथ झाटे केशव आडगळे जगन्नाथ लोंढे नितीन पोटभरे रोहित गालफाडे नितीन लोंढे मोहन काशीद परमेश्वर झाटे आदित्य आडागळे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.



# ऊसतोड मजूर राठोड दांपत्याच्या कुटुंबियांना गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानने दिला मदतीचा हात

## ना. पंकजाताई मुंडे यांनी दूरध्वनीद्वारे संवाद साधून केले कुटुंबाचे सांत्वन, प्रितमताई मुंडे यांनी सुपूर्त केला मदतीचा धनादेश

**प्रतिनिधी ।** बीड

बीड जिल्ह्यातील आश्रमशाळा तांडा येथील मयत ऊसतोड मजूर दांपत्य अनिल राठोड आणि आरती राठोड यांच्या कुटुंबियांची माजी खासदार डॉ. प्रितमताई मुंडे यांनी आज सांत्वनपर भेट घेतली. याप्रसंगी राठोड कुटुंबाचे सांत्वन करून गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने त्यांनी आर्थिक मदतीचा धनादेश सुपूर्द केला. काही दिवसांपूर्वी जिल्ह्यातील ऊसतोड मजूर राठोड दांपत्याचा कर्जत-पाथर्डी मार्गावर रस्ते अपघातात मृत्यू झाला होता. राज्याच्या पर्यावरण आणि पशुसंवर्धन मंत्री तथा भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी राठोड यांच्या कुटुंबाला गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने आर्थिक मदत देण्याचे जाहीर केले होते. माजी खासदार डॉ. प्रितमताई मुंडे यांनी आज त्यांच्या सुचनेनुसार राठोड कुटुंबाची भेट घेऊन त्यांना गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठान मार्फत आर्थिक मदत सुपूर्द केली.

यावेळी ऊसतोड ना.पंकजाताई मुंडे यांनी राठोड कुटुंबाशी दूरध्वनीद्वारे संवाद साधला. आम्ही तुमच्या पाठीशी आहोत, सर्वांची काळजी घ्या, आम्ही नेहमी तुमच्या सोबत आहोत' अशा शब्दात त्यांनी कुटुंबाचे सांत्वन केले. तसेच प्रितमताई मुंडे यांनी देखील यावेळी संवेदना व्यक्त करून राठोड परिवाराच्या पाठीशी राहण्याचा विश्वास दिला.

# बीड जिल्ह्यात बांधकाम कामगारांची होणारी हेळसांड थांबवा –लोकजनशक्ती पार्टी (र)

**प्रतिनिधी ।** अंबाजोगाई

महाराष्ट्रात सध्या बीड जिल्हा अनेक प्रकरणात गाजत आहे त्यातच एक मोठा घोटाळा उघडकीस येत आहे तो म्हणजे बांधकाम कामगार नोंदणी घोटाळा बीड जिल्हा तसेच आंबेजोगाई उपविभागात सध्या मोठ्या प्रमाणात बांधकाम कामगार घोटाळा झालेला निदर्शनास येत आहे ज्याचे उत्पन्न दहा लाखाच्या पुढे आहे तो सध्या अंबाजोगाई उपविभागात बांधकाम कामगार असल्याचे प्रमाणपत्र पैशाच्या जोरावर मिळवत आहेत याची सखोल चौकशी जिल्हाधिकारी यांनी करण्यात यावी तसेच अनेक आमदारांचे कार्यकर्ते बांधकाम कामगार म्हणून लाभ घेण्यत अग्रेसर आहेत

बांधकाम कामगारांसाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने ३२ योजना देण्यात आल्या आहेत त्या योजनेचा लाभ अनेक बोगस लाभार्थी घेत आहेत

उदा.

१) बांधकाम कामगारांसाठी घरकुल योजना २) बांधकाम कामगारांच्या मुलांसाठी स्कॉलरशिप ३) बांधकाम कामगारांच्या मुलांसाठी शैक्षणिक साहित्य ४) बांधकाम कामगारांसाठी सेफ्टी किट ५) बांधकाम कामगारांसाठी संसार उपयोगी वस्तू उदाहरणार्थ भांडे ६) बांधकाम कामगारांसाठी विमा संरक्षण अशा अनेक योजना काही नेत्यांचे कार्यकर्ते व उच्चभ्रू असलेले लोक घेताना दिसत आहेत खऱ्या असलेल्या बांधकाम कामगारांना बांधकाम कामगार सर्टिफिकेट मिळण्यासाठी बीड जिल्ह्यात पाच हजाराची मागणी करण्यात येत आहे तसेच बांधकाम कामगार या अशा अनेक योजनांपासून दूर असल्याचे दिसून येत आहे याची सखोल चौकशी करून बोगस बांधकाम कामगार प्रमाणपत्र घेणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात यावे या आशयाचे निवेदन लोक जनशक्ती पार्टी (र) च्या वतीने उपजिल्हाधिकारी



अंबाजोगाई यांना देताना लोक जनशक्ती पार्टीचे बीड जिल्हा अध्यक्ष अशोक भाऊ काळे आदित्य चौरे गंगाधर पोळ दिनेश घार व इतर




भारतीय जनता पार्टी संघटन पर्व सदस्यता नोंदणी अभियानांतर्गत सक्रिय सभासद नोंदणी शुभारंभ प्रसंगी लोकप्रिय मा.खा.प्रितमताई मुंडे यांचा सक्रिय सभासद अर्ज जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी भरुन घेतला मा.खा.मुंडे यांनी सक्रिय सभासद फी १०० रु.रोख दिले यावेळी प्रदेश ,जिल्हा,तालुका पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते


# मनुस्मृतीमुळे जनता गुलामीत गेली विज्ञानापेक्षा धर्म वरचढ झाल्यास देश रसातळाला जाईल – आनंदराज आंबेडकर

## निर्भिड पत्रकार संघाचे कार्य कौतुकास्पद – आ. प्रकाश सोळंके

**प्रतिनिधी ।** माजलगांव

मनुस्मृतीमुळे भारत देशातील जनता बौद्धिक गुलामीत गेली होती आणि आत्ता विज्ञानापेक्षा जर धर्म वरचढ झाल्यास भारत देश रसातळाला जाईल अशी सणसणीत प्रतिक्रिया रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांनी व्यक्त केली ते निर्भीड पत्रकार संघ शाखा माजलगाव आयोजित मूकनायक पुरस्कार व माजलगाव भूषण सोहळ्या प्रसंगी बोलत होते 'निर्भिड पत्रकार संघ माजलगावच्या वतिन मूकनायक दिनाचे औचित्य साधून दिनांक ०६ फेब्रुवारी रोजी शहरातील वैष्णवी मंगल कार्यालय येथे मूकनायक पुरस्कार व माजलगाव भूषण पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजना केले होतेयावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजलगाव मतदार संघाचे विद्यमान आमदार प्रकाश दादा सोळंके, उद्धघाटक रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर, प्रमुख पाहुणे म्हणून प्रखर वक्ते दीपक भाई केदार, निर्भीड पत्रकार संघाचे बीड जिल्हाध्यक्ष देवेंद्रजी ढाका, अमर साळवे , परमेश्वर सोळंके , आनंद विर , समीर काझी, किरण डोळस , मोनिका बेद्रे , आम्रपाली साबळे मूकनायक पुरस्कार प्राप्त दैनिक महाभारत चे मुख्य संपादक विजयकुमार वाव्हळ, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे बीड जिल्हा अध्यक्ष विजय दादा साळवे, मा. सभापती संभाजी शेजुळ , दै. वास्तवचे उपसंपादक अरविंद ओव्हाळ , सा. गदरचे संपादक ज्ञानेश्वर लंगे आदींची उपस्थिती होती.

प्रसंगी आनंदराज आंबेडकर म्हणाले की आपण भारतीयांनी मनुस्मृतीच्या नावाखाली खूप अन्याय अत्याचार सोसले, बौद्धिक गुलामी सोसली मात्र केंद्रातील लोक देशाला हिंदूराष्ट्र बनवण्याचे स्वप्न पाहत



आहेत , विज्ञानापेक्षा धर्म वरचढ झाला तर भारत देश सर्वच गोष्टीत रसातळाला जाईल त्यामुळे केंद्रातील सरकारच्या विरोधात आपणच लोकांचा आवाज होऊन बोलत व्हायला हवे कारण आपणही मूक नायक आहोत हे दाखवून देण्याची गरज आहे तरच खरा मूकनायक दिन साजरा झाल्याचे चिज होईल .

आमदार प्रकाश सोळंके यांनी आपल्या अध्यक्षिय भाषणात बोलताना म्हणाले की गेल्या दोन महिन्या पासुन मिडियाच्या माध्यमातुन बीड जिल्ह्यातील बातम्या जोर धरत असतांना दुसऱ्या बाजुने निर्भिड पत्रकार संघाच्या वतीने कौतुकास्पद मूकनायक पुरस्कार सोहळ्याचे आयोजन केले जाते याचा मला आनंद आहे. एकीकडे जिल्हा बदनाम होत असताना माजलगाव तालुका हा या सर्व बाजूना अपवाद आहे.स्वर्गवासी संतोष देशमुख हत्ये नंतर त्यांच्या कुटुंबीयांना मदतीचा हात म्हणून पत्रकार संघ व सर्व जाती धर्माच्या वतीने पंच्चावन्न लाख रुपयांची मदत करत माणुसकी जपण्याचे काम माजलगाव मतदार संघाने केले आहे.

निर्भिड पत्रकार संघाच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांना मुकनायक व माजलगाव भूषण पुरस्कार देवून गौरविण्यात आले. निश्चितपणे हा पुरस्कार मिळाल्या नंतर पुरस्कारार्थी मान्यवर अधिक जोमाने सक्षमपणे भरिव योगदान समाजासाठी देतील हा विश्वास व्यक्त केला.

बीड जिल्ह्यातील पत्रकारिता महाराष्ट्रात पहिल्या क्रमांकाची – दीपक केदार

बीड जिल्ह्यातील पत्रकार आणि बीड जिल्ह्याची पत्रकारिता महाराष्ट्रात पहिल्या क्रमांकाची पत्रकारिता आहे, आणि आदर्शवत पत्रकारिता आहे आम्ही बाहेर असूनही बीडचे पेपर प्रमुख्याने वाचतो इथे कसल्याही प्रकारचा भेदभाव न करता पत्रकारिता केली जात असल्यामुळे मसाजोग येतील संतोष देशमुख यांच्या खुनाचे प्रकरण उघडे पडले आणि सरकार विरुद्ध जनता अशा लढाईत सरकार तोंडाशी पडले त्यामुळेच खऱ्या पत्रकारितेला मीडिया ट्रायल नाव दिले हे नवे फॅड आता हाणून पाडण्याची गरज आहे सरकार किंवा सरकारमधील व्यक्तीवर सत्य आरोप झाला तरीही मीडिया ट्रायल म्हणून घटनेला वेगळी बाजू देण्याचा प्रताप चालू आहेत त्यामुळे बीड जिल्ह्यातील बहाद्दर पत्रकारांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून असाच गोर गरीब दिन दलित दुबळ्याच्या अन्याय अत्याचारवर लिखाण करत सर्वसामान्यांच्या पाठीशी उभा राहण्याची भूमिका ठेवावी दीपक केदार हमेशा पत्रकाराच्या पाठीशी उभा राहील असे आश्वासन दिले .

पुरस्काराला उत्तर देताना विजय साळवे म्हणाले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपलं वृत्तपत्र चालवताना जे लोक तोंड असूनही बोलू शकत नाही गप गुमान अत्याचार सहन करतात आशा लोकांचा आवाज म्हणून मूकनायक वर्तमानपत्र चालवले गेले




# कौशल्याताई लोखंडे माजलगाव भूषण पुरस्काराने सन्मानित

**प्रतिनिधी ।** बीड

राज्याला आदर्श निर्माण करून देईल असा, मूकनायक पुरस्कार सोहळा दरवर्षी आयोजित केला जातो. त्या अनुषंगाने निर्भिड पत्रकार संघ माजलगावकडून शहरातील वैष्णवी मंगल कार्यालय येथे गुरुवार (ता.६) रोजी दुपारी १२ वाजता भव्यदिव्य मूकनायक पुरस्कार व माजलगाव भूषण पुरस्कार वितरण सोहळा साजरा करण्यात आला.

माजलगाव तहसील कार्यालय येथे कार्यरत असलेल्या श्रीमती कौशल्याताई दत्ता लोखंडे यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांच्या कार्यशक्तिने आणि प्रामाणिकपणाने महसूल विभागात केलेली कामगिरी अत्यंत प्रेरणादायक आहे. त्यांच्या कार्याची गती, लोकाभिमुख दृष्टिकोन आणि प्रगल्भ प्रशासन कौशल्यामुळे अनेकांना मदत मिळाली आहे. कार्य करताना नेहमीच नागरिकांच्या समस्यांकडे संवेदनशील दृष्टिकोनातून पाहिले आणि त्या सोडवण्यासाठी आपले उत्तम मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या निष्ठेने, कौशल्याने आणि समर्पणाने महसूल सेविका म्हणून एक आदर्श निर्माण केला आहे, जो इतरांसाठी प्रेरणादायक ठरला आहे.

त्यांच्या या कार्याची दखल घेत निर्भिड पत्रकार संघाच्या वतीने त्यांना आदर्श महसूल सेविका म्हणून माजलगाव भूषण पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर साहेब, आमदार मा. प्रकाश दादा सोळंके ,ऑल इंडिया पँथर सेनेचे अध्यक्ष दीपक केदार, सभापती मा. जयदत्त आण्णा नरवडे व मान्यवरांच्या शुभहस्ते हा पुरस्कार देण्यात आला. हा पुरस्कार मिळाल्यामुळे त्यांचे सर्व स्तरांमधून अभिनंदन व कौतुक होत आहे.



मा.आ.केशवदादा आंधळे यांचे वडील यादवराव बापू आंधळे यांचं निधन झाले. मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त मा.श्री.एस.एम.देशमुख सर यांनी वडवणी शहरात समाधान निवासस्थानी भेट देऊन कुटुंबाचे सांत्वन केले. यावेळी माजी सभापती दिनकरराव आंधळे, सरपंच शंकरराव आंधळे, मधुकरराव धस व सर्व पत्रकार बांधव उपस्थित होते.

# रेल्वे पुलांचा विषय आ.क्षीरसागरांनी रेल्वे सुरक्षा आयुक्तांसमोर मांडला



**प्रतिनिधी ।** बीड

मतदारसंघातील काही ठिकाणी रेल्वे ब्रीज नसल्यामुळे वाहतुकीस अडचण होत आहे. याबाबत आ. संदीप क्षीरसागरांचा गेल्या अनेक दिवसांपासून पाठपुरावा सुरू आहे. दरम्यान बुधवारी (दि.५) रोजी बीड रेल्वेची हाय स्पीड टेस्ट करण्यासाठी रेल्वेचे सुरक्षा आयुक्त मनोज आरेरा आले असता त्यांच्यासमोर आ. संदीप क्षीरसागर यांनी हा विषय मांडला.

बीड मतदारसंघातील क्षेत्रांतर्गत शिरूर कासार तालुक्यातील हिवरसिंगा, बरगवाडी, जवळागिरी तसेच बीड तालुक्यातील चर्हाटा येथे जाण्यासाठी रेल्वे पूल करण्यात आला नाही. त्यामुळे या गावांमध्ये वाहतुकीस मोठी अडचण होत आहे. याबाबत आ. संदीप क्षीरसागरांचा सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. शासन आणि प्रशासनाकडे याविषयी आ. क्षीरसागर यांनी अनेकवेळा पत्रव्यवहार आणि बैठका घेतल्या आहेत. यावेळीही, अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वे मार्गाची जलदगती चाचणी करण्यासाठी पुणे विभागाचे रेल्वे वाहतूक सुरक्षा आयुक्त मनोज अरेरा यांच्यासह रेल्वे प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी आले असता आ. संदीप क्षीरसागर यांनी अधिकाऱ्यांची भेट घेऊन रेल्वे पुलांचा विषय त्यांच्यासमोर मांडला. तसेच रेल्वे विभागाने याबाबतचा सविस्तर प्रस्ताव याप्रकरणी तोडगा काढण्यासाठी कार्यवाही करण्याची मागणी केली. याप्रसंगी खा. बजरंग सोनवणे, माजी आ. सय्यद सलीम, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाध्यक्ष गणेश वरेकर आदी उपस्थित होते.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १०० दिवसाच्या कृती आराखड्याची अंमलबजावणी बीडमध्ये सुरु

प्रतिनिधी । बीड

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व सरकारी कार्यालये व विभागांसाठी शंभर दिवसाचा कृती आराखडा आखून दिलेला आहे . या कालावधीत सर्व कार्यालय प्रमुखांनी नेमके काय करावे , या संदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव श्री राजेश कुमार यांनी दिनांक १५ जानेवारी रोजी व्हीसीद्वारे सर्व विभागीय आयुक्त यांची आढावा बैठक घेतली होती . या बैठकीस नोंदणी महानिरीक्षक तथा मुद्रांक नियंत्रक तसेच जमाबंदी आयुक्त तथा संचालक भूमी अभिलेख , पुणे हेदेखील उपस्थित होते .

महसूल विभागाचे सहसचिव अजित देशमुख यांनी सर्व विभागीय आयुक्त , जिल्हाधिकारी , तहसीलदार , उपअधीक्षक भूमी अभिलेख यांच्या नावे २१ जानेवारी रोजी परीपत्रक काढून शंभर दिवसांचा कृती कार्यक्रम कशाप्रकारे राबवावा याबाबतच्या सविस्तर सूचना दिलेल्या आहेत . भूमि अभिलेख विभाग , महसूल विभाग , मुद्रांक शुल्क विभाग यांनी सध्या व भविष्यात कोणकोणत्या सुधारणा राबवायच्या आहेत याबाबत सविस्तर सूचना या पत्रात देण्यात आल्या आहेत . यात मुख्यत्वे महसूल विभाग , भूमी अभिलेख विभागाने सेवांसाठी पोर्टल तयार करून त्याची सुलभपणे अंमलबजावणी करण्यात यावी , स्वच्छता व वेगवान संगणकीय कार्यप्रणाली विकसित करण्यावर भर दिसतो .

राज्यातील सर्व प्रकारच्या जमिनीची नोंद ठेवणे व त्यानुसार तशा नोंदी अद्यावत ठेवणे , सरकारी जमीन प्रत्येक जिल्ह्यात शहरात किती आणि कुठे आहे हे कळण्यासाठी डॅशबोर्ड ( लँड रेकॉर्ड ) तयार करण्याचे काम हाती घेण्यात आलेले आहे , ही माहिती लवकरच उपलब्ध होणार आहे . महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण व नागरी भागातील जमीन मोजणीसाठी जीआयएस तंत्रज्ञानावर आधारित ई मोजणी २.० प्रकल्प संपूर्ण महाराष्ट्रात लागू करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत . केंद्र शासनाचा महत्त्वकांक्षी प्रकल्प ज्यात नगरपरिषद हद्दीतील मिळकतींचे जीआयएस आधारित नकाशे व मिळकत पत्रिका तयार करणे व मिळकतींची मालमत्ता कर नोंदवही अद्यावत करणे या कार्यक्रमांतर्गत पथदर्शी प्रकल्प येत्या १०० दिवसात सुरू करण्यात येणार आहे . महसूल विभागातील ग्राम महसूल अधिकारी यांनी नागरिकांकडून वसूल करावयाची जमीन महसुलाची रक्कम ही ई चावडी प्रकल्पांतर्गत ऑनलाइन पद्धतीने नागरिकांकडून भरून घ्यावी , अशाही सूचना देण्यात आलेल्या आहेत . पासपोर्ट कार्यालयाप्रमाणे भूमी अभिलेख विभागातील सर्व सेवा उदाहरणार्थ , अर्ज भरणे , नकाशे उतारा, नकला देणे इत्यादी नागरिकांना उपलब्ध करून देण्यासाठी भू प्रणाम केंद्राची स्थापना करण्यात येणार आहे . महसूल विभागांतर्गत विविध दावे दाखल करण्यात येतात . महसूल अधिकाऱ्यांचे न्यायदान विषयक जे कामकाज असतील , ज्यास अर्धन्यायिक कामकाज असे म्हणतात , ते पेपरलेस पद्धतीने कशा पद्धतीने होईल , सुनावणीच्या नोटिसा , रोजनामे , आदेश ऑनलाईन कशा पद्धतीने केले जातील यावरही प्रकाश टाकण्यात आलेला आहे .गावातील मिळकतीचे ड्रोनद्वारे जीआयएस सर्वेक्षण , गावठाण भूमापन इत्यादी बाबी स्वामित्व योजनेअंतर्गत पूर्ण करण्यात याव्यात अशाही सूचना आहेत . केंद्र शासनाच्या ग्रीस्टॅक संकल्पनेअंतर्गत पीएम किसान नोंदणीकृत शेतकऱ्यांना विशिष्ट ओळख क्रमांक देण्यात यावेत , यावरही भर देण्यात आला आहे . राज्यातील कोणत्याही भागातील नागरिकास राज्यातील कोणत्याही दुय्यम निबंधक कार्यालयात दोस्त नोंदणी करता येण्यासाठी वन स्टेट वन रजिस्ट्रेशन संकल्पना राबविण्यात येणार आहे . त्यासाठीचेही धोरण अंतिम टप्प्यात असल्याचे दिसून येते .

सध्या रेडी रेकनरचे दर विशिष्ट विभागनिहाय असतात . ते गावनिहाय , प्लॉट निहाय मिळविता येण्यासाठी अधिकारी , कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्याबाबतही नियोजन आहे . नोंदणी व मुद्रांक विभागातील कार्यालयांचे आधुनिकीकरण करून जनतेला अधिकाधिक सोयी सुविधा देण्यात याव्यात , अशा सूचना यात आहेत . संपूर्ण भूसंपादन प्रक्रियेला वेगवान व पारदर्शी करण्यासाठी ऑनलाईन पोर्टल तयार करण्यात येईल . पोर्टल द्वारे भूसंपादन प्रक्रियेची कार्यक्षमता पारदर्शकता वाढविण्यासाठीच्या सूचना यात आहेत . महसूल विभागातील संकेतस्थळावरील माहिती अद्ययावत करणे , शासनाचे निर्णय , योजना , संपूर्ण माहिती नागरिक व गावपातळीवर कशाप्रकारे जातील यासाठी प्रयत्न करण्याबाबत सूचना आहेत .

महा-ई-सेवा केंद्र , आपले सरकार सेवा केंद्र , सेतू सुविधा केंद्र , कॉमन सर्विस सेंटर हे कसे आदर्श होतील याबाबत आढावा घेण्याबाबत ही सूचना आहेत . केंद्राच्या अभिनव पहल या पोर्टलमध्ये राज्यातील अधिकाऱ्यांमार्फत झालेल्या चांगल्या उपयोजना टाकाव्यात , अशाही सूचना यात आहेत . प्रांताधिकारी , तहसीलदार यांनी ग्रामीण भागात फिरून नागरिकांना जास्तीत जास्त मार्गदर्शन करावे याबाबतही यात सूचना देण्यात आल्या आहेत .

एकंदरीतच शासकीय कार्यालयांचे जनतेप्रती असलेले उत्तरदायित्व उचितरित्या निभावण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांना सूचना दिल्याचे दिसते . स्थानिक पातळीवरील अधिकारी कर्मचारी यांनी याची अंमलबजावणी करावी ही अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे .

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सूचनांचे काटेकोर पालन करण्यात यावे याबाबत बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी वेळोवेळी सर्व अधिनस्त अधिकारी कर्मचारी यांना सूचित केले आहे . निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनीसुद्धा सर्व उपविभागीय अधिकारी यांची बैठक घेऊन कार्यालयीन स्वच्छता करण्यात यावी , नागरिकांशी संयमाने बोलावे याबाबत वेळोवेळी सूचना दिलेल्या आहेत . बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी सुद्धा जनतेची गाऱ्हाणी ऐकून घेण्यासाठी जास्तीत जास्त वेळ देण्याचा प्रयत्न सुरू केला आहे .

यासंदर्भात बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी नमूद केले की शासनाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याचा निश्चितच प्रयत्न मी करत आहे . जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या सूचनेनुसार यापूर्वी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सर्व सोळा मंडळात बैठका घेतल्या आहेत . यानंतरही अशा बैठका नियमितपणे घेण्यात येतील व स्थानिक प्रश्न जागेवर कशाप्रकारे सोडविण्यात सोडविले जातील यावर भर दिला जाईल , असे यावेळी शेळके म्हटले .शुक्रवारी तहसीलदार चंद्रकांत शेळके , त्यांचे अधिनस्त नायब तहसीलदार सुरेंद्र डोके , पुरवठा निरीक्षण



अधिकारी प्रशांत सुपेकर , संतोष मुळीक , श्रीराम वायभट , अनिल विद्यागर , ग्राम महसूल सेवक दिनेश माने , रेवन्नाथ पवार व इतर अधिकारी , कर्मचारी यांनी स्वच्छता मोहीम हाती घेतल्याचे दिसून आले . मुख्यमंत्र्यांच्या सूचनेचे पालन इतरही कार्यालयात होईल आणि स्वच्छ व सुंदर माझे कार्यालय ही संकल्पना अस्तित्वात येईल अशी नागरिकांमध्ये चर्चा दिसून आली .



आज बीड एमआयडीसी बाबत शासकीय विश्रामगृह येथे बैठक घेतली. बीड शहरातील एमआयडीसी चा विकास व्हावा या ठिकाणी मोठे मोठे उद्योग यावेत, यातून रोजगार निर्मिती व्हावी व आपल्या बीड जिल्ह्याचा औद्योगिक विकास व्हावा यासाठी मागील आठवड्यात राज्याचे उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री मा.ना.अजितदादा पवार यांची भेट घेतली होती.आज याबाबत एमआयडीसी विभागाच्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी मा.सोनाली मुळे, प्रादेशिक अधिकारी अधिकारी अमित भामरे व अन्य अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठक घेतली. एमआयडीसी साठी जमिनीची पाहणी देखील झाली असून यापुढील काळात बीड जिल्ह्याचा औद्योगिक विकास होईल यात शंका नाही.

## रेशीम बंध, निरंजन, विनोदवारी,सेवाव्रती मेजर या पुस्तकांचा प्रकाशन सोहळा

प्रतिनिधी । बीड

शहरातील सौभाग्य मंगल कार्यालयात दि ९ फेब्रुवारी रविवार रोजी सकाळी ११ वा.अपर्णा कुलकर्णी व अश्विनी निवर्गी लिखित पुस्तकाचे प्रकाशन व तुकाराम महाराज पुरस्कार प्राप्त वेदप्रकाश वेदालंकार यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमासाठी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे मार्गदर्शक डॉ.सुरेश खुरसाळे, सुनीता देशमुख नागपुरच्या विजया मारोतकर व ख्यातनाम साहित्यिक वेदप्रकाश वेदालंकार हे उपस्थित राहणार आहेत.सेवावृत्ती मेजर एस.पी. कुलकर्णी यांनी एनसीसीच्या माध्यमातून केलेले कार्य हे सेवावृत्ती मेजर या पुस्तकातील लेखाद्वारे घेऊन त्यातून जनजागृतीसाठी प्रकाश टाकला आहे. अपर्णा कुलकर्णी यांनी निरंजन, रेशीमबंध या पुस्तकातून नात्यातील उत्सव चारोळी हे विषय साधण्याचा प्रयत्न केला आहे निरंजन या काव्यसंग्रहातून कवितेद्वारे प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला आहे तसेच विनोदवारी या पुस्तकातून समाज प्रबोधन करण्यात आले आहे या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे लेखिका अपर्णा कुलकर्णी अश्विनी निवर्गी यांनी स्वतःच्या लिहिलेल्या पुस्तकांनी आईची तुला करण्यात येणार आहे पुस्तकाचे वाटप तुलेनंतर करण्यात येईल अशी एक वेगळी मांडणी या कार्यक्रमात होणार आहे.

श्रीमती विजया चपळगांवकर यांनी मुख्याध्यापिका म्हणून शैक्षणिक क्षेत्रात मोठे काम केले शिस्त, काटेकोरपणा आणि विद्यार्थ्यांच्या विकासासाठी त्यांचे मोठे कार्य आहे कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन अपर्णा कुलकर्णी, अश्विनी निवर्गी,सीमा पांडे,भूषण क्षीरसागर यांनी केले आहे.




अंगणवाडी क्र. ९२ इमामपूर रोड बीड येथे माता रमाई जयंती साजरी करण्यात आली वेशभूषेत प्रियांशी उत्तम ओव्हाळ माही जाधव पारमी जावळे यांनी सहभाग घेतला से.वडमारे संगीता म.सत्यवती विडेकर

## दि.०९ फेब्रुवारी २०२५ (रविवार)रोजी अंबाजोगाई येथे शैक्षणिक चर्चासत्राचे आयोजन

अंबाजोगाई / प्रतिनिधी

अखिल भारतीय समाजवादी शिक्षण हक्क सभा, शाखा अंबाजोगाई यांच्या वतीने दि.०९ फेब्रुवारी २०२५ (रविवार) रोजी सायं ४.३० ते ७.०० या वेळेत श्री योगेश्वरी नूतन विद्यालयाच्या गोटे गुरुजी सभागृहात नविन शैक्षणिक धोरण २०२० आणि भारतीय ज्ञान प्रणाली या विषयावर एक दिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

या चर्चासत्रासाठी अध्यक्षस्थानी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष डॉ. सुरेश खुरसाळे यांची उपस्थिती लाभणार आहे. तसेच चंद्रशेखर बर्दापूरकर (अध्यक्ष योगेश्वरी शिक्षण संस्था, अंबाजोगाई) यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत हे चर्चासत्र होणार आहे. नवीन शैक्षणिक धोरणाच्या संदर्भाने भारतीय ज्ञान प्रणाली (आय के यस खघड) या संकल्पनेबाबत चर्चा व मार्गदर्शन करण्यासाठी शैक्षणिक चळवळीतील ज्येष्ठ शिक्षणतज्ञ तथा अखिल भारतीय शिक्षण हक्क सभेचे राज्यकार्याध्यक्ष डॉ. शरद जावडेकर हे प्रमुख मार्गदर्शन करणार आहेत. तसेच म. गांधी अध्यासन केंद्राच्या संचालिका प्रा डॉ.शैलेजा बरुरे या विषयासंदर्भात आपले विचार मांडणार आहेत.

मा. शरद जावडेकर यांनी घऋके जी ते पी जी झऋसर्वांना समान व मोफत शिक्षणाच्या हक्कासाठी महाराष्ट्रभर शैक्षणिक चळवळ उभी केलेली आहे. तसेच नुकताच खाजगी शाळांमध्ये आर टी इ ठढए प्रवेश संदर्भातील चुकीच्या धोरणांविरोधात न्यायालयीन लढा जिंकून सर्वसामान्य विद्यार्थ्यांना खाजगी शाळांमध्ये (२५%) प्रवेशाचा मार्ग खुला करण्यात त्यांचा खूप मोठा वाटा आहे. वीस वर्षांपासून त्यांनी केलेल्या शैक्षणिक कार्याची दखल घेत महाराष्ट्र फौंडेशन या संस्थेचा सामाजिक कार्यकर्ता हा अत्यंत मानाचा पुरस्कार त्यांना प्राप्त झालेला आहे. मा. शरद जावडेकर यांचे विचार ऐकण्याची संधी या चर्चासत्रातून शिक्षण प्रेमी व सर्वसामान्य लोकांना प्राप्त होत आहे.

तरी अंबाजोगाई शहर व परिसरातील शिक्षक, प्राध्यापक, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील कार्यकर्ते, पत्रकार व सर्व स्त्री-पुरुष नागरिकांनी या चर्चासत्रात सहभागी व्हावे. तसेच आर ती इ ठढए अंतर्गत शालेय प्रवेश प्रक्रियेशी संबंधित पालकांनाही या चर्चासत्रात सहभागी व्हावे.



## ग्रामीण रुग्णालयात स्त्री जन्माचं स्वागत

### ‘मुलगी झाली हो’ म्हणताच धर्माबाद रुग्णालयात साजरा होतो आनंदोत्सव

धर्माबाद / प्रतिनिधी

काही ठीकाणी मुलगा झाला कि सर्वोच्च आनंद साजरा केला जातो. पण मुलगी म्हटल कि काही ठीकाणी नाराजी असतेचं. पण धर्माबादमधील ग्रामीण रुग्णालयात मुलगी झाली की डॉक्टर, परिचारीका, संपूर्ण रुग्णालयाचा स्टाफ स्त्री जन्माचं भरभरून स्वागत करतात. मुलगी झाल्यानंतर त्या बाळाला कपडे, भेटवस्तू, फुलांचाहार, बुके, केक कापून स्वागत करतात. स्त्री जन्माचे स्वागत फुलांचा हार, बुके देवुन केले जाते शिवाय पेढे देखील वाटले जातात. धर्माबाद ग्रामीण रुग्णालयात जानेवारी २०२४ ते डिसेंबर २०२४ पर्यंत २०४ महिला प्रसूती झाल्या. यात ११६ मुले व ८८ मुली जन्माला आल्या. जन्मदर मुलांपेक्षा मुलींची संख्या कमी आहे. मुलींचा हा आकडा वाढला पाहिजे म्हणुन समुपदेशन केलं जातं, मुली सुध्दा वंशाचा दिवा आहे. त्या जगल्या पाहिजे यासाठी प्रयत्न केले जातात. विशेष म्हणजे या रुग्णालयात नैसर्गिक प्रसुतीचे प्रमाण जास्त आहे. जवळपास ८०% महिला या नैसर्गिक प्रसुती होतात तर आवश्यकता पडली तर सिझिरियन साठी रेफर केले जात.या दवाखान्यात महिला तज्ञ डॉक्टर नसल्यामुळे रेफर केल्या जाते असे सांगण्यात आले. हे रुग्णालय सोयी-सुविधांनी सुसज्ज आहे. जननी सुरक्षा आरोग्य योजना अंतर्गत लाभार्थ्यांना घरपोच सेवा दिली जाते. रुग्णांना मोफत जेवणही दिलं जात.पंतप्रधान मातृत्व योजना, जननी शिशु सुरक्षा योजना, मानव विकास शिबिर, लेक लाडकी योजना या चार योजना ग्रामीण रुग्णालयात राबविण्यात येतात. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना शासनाकडून त्यांच्या अकाउंटवर मानधन दिल्याजाते. सोनकांबळे दांपत्यास कन्यारत्न होताच जन्मोत्सव दि. ३ फेब्रुवारी रोजी ग्रामीण रुग्णालय धर्माबाद येथे विवेक सोनकांबळे व नंदनी विवेक सोनकांबळे या नावाच्या दांपत्यास आदी परिचारिका जयश्री किनवाड यांच्या हस्ते सायंकाळी चार वाजता कन्यारत्न प्राप्त झाले आहे. याचा आनंद व्यक्त करत ग्रामीण रुग्णालय धर्माबाद येथे वैद्यकीय अधीक्षक डॉ. वेणूगोपाल पंडित, वैद्यकीय अधिकारी प्रतीक्षा अरबड़वार व इन्चार्ज सिस्टर सूर्यवंशी शुभांगी यांच्या मार्गदर्शनाखाली मुलीचा जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी बाळाला कपडे, भेटवस्तू व केक कापून याचा आनंद साजरा करण्यात आला. सर्व अधिकारी व स्टाफ कर्मचारी उपस्थित होते.

## ओंकार साखर ग्रुपला आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्रदान

कुडूत्री / प्रतिनिधी

ओंकार साखर कारखाना परिवाराने महाराष्ट्रातील विविध गावात ऊस उत्पादक शेतकरी, कर्मचारीवर्ग व ऊसतोड कामगारांसाठी भरीव योगदान दिले. आर्थिक प्रगती साधून सर्व युनिट मधील त्या-त्या भागाचा कायापालट केला आहे. याची दखल घेऊन नवी दिल्ली येथील शिया २०२५ मध्ये साखर उद्योगातील अति जलद आंतरराष्ट्रीय पुरस्काराने ओंकार साखर कारखाना ग्रुपला सन्मानित करण्यात आले. दिल्ली येथील चिनीमुडी फेस्टिव्हलमध्ये सिने आभिनेतानिल मुकेश यांच्या हस्ते ओंकार ग्रुपचे संचालक ओमराजे बोत्रे-पाटील यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. ओंकार साखर कारखाना परिवाराचे चेरअमन बाबुराव बोत्रे-पाटील, संचालिका रेखाताई बोत्रे पाटील, संचालक प्रशांतराव बोत्रे पाटील यांनी मागच्या बारा वर्षापासून बंद




असलेला निलंगा तालुक्यातील अंबुलगा येथील डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर सहकारी साखर कारखाना यांच्यासह महाराष्ट्रातील विविध गावातील बंद असलेले अनेक साखर कारखान्यांना उर्जित अवस्थेत आणले.

## पाटोदा येथील जिल्हा परिषद शाळेत आनंद नगरी उत्साहात

अंबाजोगाई / प्रतिनिधी

भावी आयुष्यात विद्यार्थ्यांना व्यवहाराविषयी अधिक ज्ञान प्राप्त व्हावे व त्यांना नफा तोटा समजून येण्या करीता जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाटोदा येथील विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल लाऊन आनंद नगरी सजवली होती. यामध्ये समोसे, गुलाब जामुन, पॅटीस, भजे, शिरा, बालूशाही, , पाणीपुरी, विविध फळा सह अनेक खाद्यपदार्थ चे स्टॉल विक्रीसाठी लावले होते. या आनंद मेळाव्यासाठी गावचे सरपंच, पालक वर्ग शिक्षक, तसेच गावातील लोकप्रतिनिधी प्रतिष्ठित नागरिक पालकवर्ग यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. त्यांनी चिमुकल्यांनी लावलेल्या दुकानातून मोठ्या प्रमाणात खरेदी केली. यावेळी विद्यार्थ्यांमध्ये मोठा



उत्साह दिसून विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या हर्ष उल्हासात सहभाग नोंदवला होता.दरम्यान खाद्यपदार्थाची विक्री करून विद्यार्थ्यांनी घेतला आनंद तालुक्यातील पाटोदा ममदापूर येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आनंद नगरीचे आयोजन करण्यात आले होते. आनंद नगरीचा विद्यार्थ्यांनी खाद्यपदार्थाचे विक्री करून आनंद घेतला.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT